# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 10/07/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

## संचारबंदी दरम्यान देवलापार पोलीसांची जुगार अडयावर धडक कार्यवाई

दिनांक 09/07/2020 रोजी ठाणेदार सपोनि प्रविण बोरकुटे पो. स्टे. देवलापार यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम देवलापार परीसरातील करवाही मंसाराम टोला येथील रामदास उईके यांच्या घराचे खुल्या छपरीमध्ये मोठया प्रमाणात तासपत्यावर पैशांची बाजी लावून जुगार अड्डा चालवुन खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन पो. स्टे. देवलापारच्या स्टाफने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता आरोपी क्र. 1) शैलेश रामदास उईके, वय 27 वर्ष, रा. करवाई, 2) दिगांबर दयाराम गोवर्धन, वय 21 वर्ष, रा. करवाई, 3) पंचराम हिरेलाल सलामे, वय 45 वर्ष, रा. करवाई 4) गुरूदास गोकुलदास टिकापाची, वय 28 वर्ष, रा. करवाई, 5) नरेंद्र गोविंदराव गडेर, वय 24 वर्ष रा. करवाई, 6) हरीचंद कलीराम मरसकोल्हे, वय 30 वर्ष, रा. कामठी पो.स्टे. देवलापार, 7) शाम ईश्वरदास डेहरवाल, वय 30 वर्ष, रा. उतरीया ता. कुरई जिल्हा शिवणी (म.प्र), 8) पंकज केशव खराटे, वय 23 वर्ष, रा. उतरीया ता. कुरई जिल्हा शिवणी (म.प्र), 9) महेश रामु खंडाते, वय 23 वर्ष, रा. उतरीया ता. कुरई जिल्हा शिवणी (म.प्र), 10) सुरेंद्र विनोबा लाडे, वय 31 वर्ष, रा. रेड्डी ता. कुरई जिल्हा शिवणी (म.प्र) हे तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून पैशांचा हारजितचा प्रत्यक्ष जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 52 तासपत्ते, 8 मोबाईल, 07 दुचाकी वाहन व नगदी 8,570/— रू. असा एकुण किंमती 3,34,070/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण बोरकुटे यांनी पो.स्टे. देवलापार येथे आरोपीतांविरुध्द कलम 12(अ) मुंबई जुगार कायदा सहकलम 188 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. मोरेश्वर नागोसे हे करीत आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती नयन आलुरकर रामटेक विभाग यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक प्रविण बोरकुटे, पोना सनदलाल मरकाम, राकेश नलगुंडवार, संदिप नागोसे, मोरेश्वर नागोसे पो.शि. रमेश खरकटे, राहुल कांकेटवार, सुर्यप्रकाश वावरे, कुलदीप आहाके यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर